# पोलीस उपनिरीक्षक पूर्व परीक्षा,२०१४

## अर्ज सादर करण्याच्या दिनांकास मुदतवाढ

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे प्रसिद्ध करण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक पूर्व परीक्षा २०१४ या परीक्षेकरिता करीता अर्ज सादर करण्याचा दिनांक २१ एप्रिल,२०१४ असा निश्चित करण्यात आला होता. तथापि, ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी उमेदवारांना येणा-या तांत्रिक अडचणी विचारात घेऊन अर्ज सादर करण्याच्या, तसेच चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेमध्ये रक्कम भरण्याच्या दिनांकास खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात आली आहे -

(१) विहित पध्दतीने माहिती सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची अथवा क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबँकिग, अथवा संग्राम केंद्र/ सीएससी - नागरिक सेवा केंद्राद्वारे रक्कम भरण्याची कार्यवाही **दिनांक २४ एप्रिल,२०१४ रोजी २३.५९ वाजेपर्यत** पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

(२) चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बॅकेमध्ये **दिनांक २५ एप्रिल,२०१४ पर्यत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत** भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**मुंबई**
**दिनांक : २१ एप्रिल,२०१४**

**सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**